# औरंगाबाद ग्रामीण पोलीस दलातील पोलीस अंमलदार बदली धोरण- २०२२

दरवर्षी पोलीस अंमलदार हे त्यांच्या नेमणुकीच्या ठिकाणी पाच वर्ष पुर्ण झाल्यानंतर प्रशासकीय बदलीस पात्र असतात. अश्या पोलीस अंमलदारांच्या बदल्या करतांना त्यांच्या विनंती प्रमाणे नेमणुक मिळावी, त्यांना सर्व शाखांचे कामकाजांचा अनुभव मिळावा, तसेच प्रशासकीय दृष्टीकोणातुन सर्व रिक्त पदे भरली जावी आणि औरंगाबाद ग्रामीण जिल्हयातील रहिवासी असलेले पोलीस अंमलदार यांना स्वतःचा तालुका सोडुन इतर तालुक्यात मध्ये काम करण्याची संधी मिळावी आणि पोलीस अंमलदारांच्या बदली मध्ये पारदर्शकता आणि निपक्षपातीपणा येण्यासाठी सदर धोरण प्रस्तावीत करत आहोत. हे धोरण एक मार्गदर्शक सुचना असुन विशिष्ठ परिस्थीतीत प्रशासकीय कारणास्तव पदस्थापना देते वेळी त्या मध्ये बदल करण्याचा अधिकार पोलीस आस्थापना मंडळास राहील.

१) वरील धोरण अंमलबजावणीच्या दृष्टीने पोलीस दलातील विविध पदांचे वर्गीकरण खालील प्रमाणे राहील :-
   - **कार्यकारी पदे :-** सर्व पोलीस ठाणे, सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा व आर्थीक गुन्हे शाखा
   - **अकार्यकारी पदे :-** वरील ठिकाणे वगळता इतर सर्व शाखामधील तसेच प्रतिनियुक्तीची पदे.

२) औरंगाबाद ग्रामीण पोलीस दलात नियुक्त झालेल्या प्रत्येक अंमलदार यांना त्यांचे हजर झालेल्या दिंनाका पासुन किमान ५ वर्षासाठी पोलीस मुख्यालय येथे नियुक्ती देण्यात येईल. या नियुक्तीच्या कालावधीमध्ये पोलीस अधीक्षक कार्यालयाची विविध अकार्यकारी शाखामध्ये तसेच पोलीस मुख्यालयाच्या शाखे मध्ये आणि राखीव मध्ये त्यांना कर्तव्य देता येईल.

३) औरंगाबाद ग्रामीण पोलीस दलात नियुक्त झालेल्या प्रत्येक अंमलदार यांचा पोलीस मुख्यालयाचा ५ वर्षाचा कार्यकाळ पुर्ण झालेनंतर अंमलदारांची विनंती, प्रशासकिय निकड, रिक्त पदांची स्थिती आणि त्यांचा मुळ तालुका लक्षात घेवुन त्यांना कार्यकारी पदावर पोलीस ठाणे येथे बदली करण्यात येईल, तसेच सर्वसामान्य बदली-२०२२ चे वेळी २०१७ मध्ये हजर झालेले सर्व अंमलदार पात्र राहतील.

४) गुन्हे शाखा व आर्थिक गुन्हे शाखा येथे पदस्थापना देते वेळी यापुर्वी गुन्हे शाखा किंवा आर्थीक गुन्हे शाखा येथे कामकाज न केलेले अंमलदार यांना प्राधान्य देण्यात येईल. तसेच आर्थीक गुन्हे शाखेमध्ये संबंधीत अंमलदाराच्या शैक्षणिक पात्रतेप्रमाणे नियुक्ती दिली जाईल. वरील दोन्ही शाखेंचा कार्यकाळ ०५ वर्षांचा राहील.

५) सलग दोन वेळा कार्यकारी शाखेमध्ये सेवा बजावणी झालेली असल्यास सदर अमलदारांची नियुक्ती ५ वर्षाकरीता अकार्यकारी शाखेत करण्यात येईल. सदरची पदस्थापना देतांना संपुर्ण सेवाकाळात पुर्वी जर एखादया अकार्यकारी शाखेत कर्तव्य बजावले असेल, तर तेथे पदस्थापना न देता इतर अकार्यकारी शाखेत पदस्थापना देण्यात येईल.

६) अकार्यकारी शाखेमध्ये ५ वर्ष पुर्ण केल्यानंतर कार्यकारी शाखेत पदस्थापना देण्यात येईल. मात्र संपुर्ण सेवाकालावधीत जर एखादया तालुक्यामध्ये खंडीत-अखंडीत १० वर्ष कार्यकाळच पुर्ण झाला असेल तर त्या तालुक्याचे सर्व पोलीस ठाणे वगळुन इतर तालुक्याचे पोलीस ठाण्यामध्ये पदस्थापना देण्यात येईल, किंवा इतर कार्यकारी शाखेमध्ये अभिलेख पडताळणीचे अधीन राहुन पदस्थापना देण्यात येईल.

७) सेवानिवृत्तीकरीता ०२ वर्ष शिल्लक असल्यास व अंमलदाराने तशी विनंती केल्यास, तेथेच कार्यरत ठेवता येईल, किंवा जर त्यांचे मुळ तालुक्यामध्ये त्यांची सध्याची पदस्थापना आहे, त्याबाबत त्यांचा सेवाभिलेख पडताळणी करुन त्यांची विनंती लक्षात घेवुन बदली इतर ठिकाणी करता येईल.

Goyal
25/02

Scanned with CamScanner

८) सेवानिवृत्ती पुर्वीची शेवटची पदस्थापना पोलीस अंमलदारांची विनंती नुसार करता येईल. मात्र रिक्त पदे नसल्यास अथवा प्रशासकिय निकड असल्यास आणि त्यांचे मुळ तालुक्याचा विचार करुनच त्यांची उचित ठिकाणी बदली करण्यात येईल.

९) प्रशासकिय कारणास्तव (उदा-गुन्हा दाखल, विभागीय चौकशी/प्राथमिक चौकशी सुरू, कसुरी अहवाल, निलंबन, दिर्घकाळ गैरहजर, प्रतिकुल कामगिरी, जनतेकडुन तक्रार व इतर कारणे ) ज्या अंमलदारांना अकार्यकारी शाखेत पदस्थापना दिली आहे, त्यांचा जरी सदर ठिकाणी विहीत कालावधी पुर्ण झाला असेल, तरीही वरील बाबीचा विचार करुन व रिक्त पदाची खात्री करुन त्यांना अकार्यकारी पदावर कायम ठेवता येईल.

१०) काही विशेष कारणास्तव विशेष प्रशिक्षीत व कसब असलेले पोलीस अंमलदार (उदा- कवायत निर्देशक, डॉग हॅन्डलर, बॅन्डस मॅन, आरमोरर, क्युआरटी, खेळाडु) यांचे बाबत निर्णय घेण्यास पोलीस आस्थापना मंडळ सक्षम राहील.

११)मोटार परिवहन विभागामध्ये कार्यरत आणि बदलीसाठी पात्र असलेले अंमलदार यांना बदलीसाठी संधी दिली जाईल, जर त्यांना मोटार परिवहन विभागामध्ये कायम राहावयाचे आहे, ते पुढच्या सर्वसामान्य बदल्या पावेतो तेथे कार्यरत राहतील. तथापि वाहन चालकांची कमतरता असल्यामुळे अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार आस्थापना मंडळाकडे राहील.

१२) वैद्यकिय कारणास्तव किंवा अपघात आणि इतर कारणामुळे शारीरिक दृष्टीकोनातुन दुर्बल झालेले कर्मचारी यांना अकार्यकारी शाखेमध्ये पदस्थापना देण्यात येईल.

१३) कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याची एक महत्वपूर्ण जबाबदारी पोलीसांवर असते. स्थानिक पातळीवर काम करीत असतांना अंमलदार यांना त्यांचे स्वतः ज्ञात असलेले गांवकरी, पुढारी तसेच नातेवाईकांच्या विरुध्द जाऊन देखील कर्तव्य पार पाडावे लागते, अशा परिस्थितीत कधी-कधी गैरसमजातून किंवा जाणिवपूर्वक पोलिसांवर आणि त्यातल्या-त्यात ते ज्या मूळ तालुक्याचे रहिवाशी आहेत, त्यांच्यावर पक्षपातीपणाची टिका होते. अशा प्रकारची क्लिष्ट व कठिण परिस्थिती विचारात घेता, पोलिसांच्या कर्तव्यामध्ये निःपक्षता व पारदर्शकता येण्यासाठी सर्वसाधारण बदल्या-२०२२ चे वेळी जर एखाद्या पोलीस अंमलदाराची बदली यापूर्वी त्यांच्या मुळ तालुक्यामध्ये झालेली असेल, तर अशा अंमलदारांची मुदतपूर्व बदली देखील यावर्षी होणा-या सर्वसाधारण बदल्यांचे वेळी विचारात घेण्यात येईल.

१४) कौटुंबिक किंवा व्यक्तीगत बाबीचा विचार करुन अंमलदार यांची विनंती लक्षात घेता येईल तथापी अशी पदस्थापना करतांना सदरिल धोरणाचे अनु.क्र ५ व ६ ला प्राधान्य देण्यात येईल.

१५) कोणत्याही पोलीस अंमलदाराने बदली बाबत कोणत्याही राजकिय व्यक्तींचा किंवा इतर बाह्य दबाव आणण्याचा प्रयत्न
करु नये. सर्वसामान्य बदलीचे वरील धोरण अंतिम झाल्यांनतर त्याप्रमाणे बदली करण्यात येईल.

सदरचे धोरण हे प्रस्तावित स्वरुपात आहे. सर्व अंमलदारांना सुचना करण्यात येते की ,त्यांचे या धोरणाबद्दल सुचना किंवा आक्षेप असेल तर reader.pol.abdr@mahapolice.gov.in या ई-मेल आयडीवर दिनांक २०/०३/२०२२ पावेतो सादर करावे. सर्व सुचना व आक्षेपांचा विचार करुन सर्वसामान्य बदली -२०२२ चे अंतिम धोरण प्रकाशित करण्यात येईल.

Goyal
25/02

Scanned with CamScanner